# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७८०**

**अपिलार्थी श्री. सुधाकरराव नगरकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (का.क्र.५)**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्थापना-२)**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०५.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०२.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०९.२०२४ | ०१.१०.२०२४/१६.१०.२०२४ | १२.११.२०२४ | ०१.०१.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २७.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.१०.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०१.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २०.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(१) "पोलीस उप निरीक्षक पदाची सन १९८९ ते सन १९९० पर्यंतच्या सेवाज्येष्ठता याद्या प्रती.*

*(२) श्री. सुधाकर रघुनाथराव नगरकर, पोलीस उप निरीक्षक यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या गोपनिय अभिलेखाच्या नस्तीची छायांकित प्रत.*

*(३) श्री. श्रीराम सरोदे, आश्रफ पठाण, विनोद कायंदे, एन. के. नाईक, शिवाजी पाटील व एम.ए. रफिक हे सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक पदावर पदोन्नत झाल्याची नोंद असलेल्या सेवाज्येष्ठतेची प्रत."*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.१०.२०२४ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, पोलीस उप निरीक्षकांच्या सेवाजेष्ठता याद्या या कार्यासनाकडून अद्ययावत केल्या जातात. आपण मागणी केलेली माहिती ४४ वर्षापूर्वीची असून या कार्यालयाच्या अभिलेखाचा शोध घेतला असता, सदर माहिती मिळून आलेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.१०.२०२४ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (२) बाबत कळविले की, सेवानिवृत्त पोलीस उप निरीक्षक यांचे गोपनिय अहवालाची मागणी केलेली माहिती ४४ वर्षापुर्वीची असून या कार्यासनात उपलब्ध अभिलेखाचा शोध घेतला असता, सदरची माहिती मिळून आलेली नाही.

५. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२.११.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०१.२०२५ रोजी नोंदविले की, उपलब्ध अभिलेखाची छाननी केली असता, तेथील मोठ्या प्रमाणातील अभिलेख वाळवी लागुन भुगा झाल्याचे निष्पन्न झाले असल्याची बाब अपिलार्थी यांचे निदर्शनास आणून दिले आहे. तसेच त्यादरम्यान कार्यासन क्र. ५ मधील अभिलेख वाळवी लागून नष्ट झाल्याची बाब कार्यासन क्र. ५ यांनी त्यांचेकडील नस्ती क्र.पोमसं/५/१०/लोखंडी कपाटे व संगणक / २४८/२०१६ अन्वये वाळवी लागलेल्या अभिलेखाची फोटोसहीत वरिष्टांचे निदर्शनास आणुन दिले असता, तत्का. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांनी सदर नस्तीवरील टि.प. ६ व अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांनी टि.प. ७ अन्वये अवलोकन करुन त्यावर दि. १५.०३.२०२४ अशी दिनांकित स्वाक्षरी केलेली आहे. सदरची बाब मी अपिलकर्ता यांना नस्ती व वाळवी लागलेल्या अभिलेखाचे फोटोच्या प्रती व्हिडिओ कॉलद्वारे प्रत्यक्ष दाखवून, त्यामुळे त्यांना त्यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती देता येणार नसल्याने सदर नस्तीवरील टिप्पणी व वाळवी लागलेल्या अभिलेखाच्या फोटोच्या प्रती अपीलामध्ये अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देऊन त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला असल्याचे अपिलकर्ता यांना सुनावणीदरम्यान सांगितला आहे. त्यास अपिलकर्ता यांनी सहमती दर्शविली आहे.

या कार्यालयातील कार्यासन क्र. ५ मधील नस्ती क्र.पोमसं/५/१०/लोखंडी कपाटे व संगणक /२४८/२०१६ मधील टिप्पणी परिच्छेद १ ते ८ च्या प्रती, सदर नस्तीवरील वाळवी लागलेल्या अभिलेखाच्या फोटोच्या प्रतीसह यासोबत जोडुन अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे असे नमुद करुन अपीलकर्ता यांचा अपील अर्ज निकाली काढलेला आहे.

६. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०५.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, माहितीचा अधिकार अर्जामध्ये अर्जदार यांनी मागणी केलेल्या ३ मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ व ३ हे अन्य जन माहिती अधिकारी कार्यासन क्र. २ व ९ यांचेशी संबंधीत असल्याने त्यांचेकडे पाठविण्यात आले. तसेच संबंधीत मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षकांच्या सेवाज्येष्ठता यादीबाबत अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही ४४ वर्षापूर्वीची असून, या कार्यालयाच्या अभिलेखाचा शोध घेतला असता, सदर माहिती मिळून आलेली नाही, असे अर्जदार यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी, तथा कार्यासन अधिकारी, यांनी या कार्यालयाचे पत्र क्र.पोमस/५/१०/मा.अ.नगरकर/३५/२०२४, दि. ०१.१०.२०२४ अन्वये उत्तर देण्यात आले आहे.

सदर माहिती अधिकार अंतर्गत अर्जातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने देण्यात आलेल्या उत्तराने अर्जदाराचे समाधान न झाल्याने व्यथित होवून अर्जदार श्री. सुधाकर नगरकर यांनी दि. १२.११.२०२४ अन्वये प्रथम अपिल अर्ज सादर केला. सदरचे प्रथम अपिल या कार्यालयास दि. २९.११.२०२४ रोजी व तत्का उस (आस्था-२) तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१२.२०२४ रोजी प्राप्त झाला होता. अर्जदार, श्री. सुधाकर नगरकर यांनी सादर केलेल्या दि. १२.११.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने, अपिलार्थी श्री. नगरकर यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाची सन १९८१ ते सन १९९० पर्यंतच्या सेवाज्येष्ठता याद्या प्रतीची माहिती मिळणेबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने त्यांचे म्हणणे समक्ष कथन करण्यासाठी दि. २४.१२.२०२४ रोजी दुपारी ३.३० वा. सुनावणी आयोजित करुन, त्यांना संधी उपलब्ध करुन दिली असता, अपिलार्थी हे व्हीडीओ कॉलद्वारे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान तत्का. जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी कार्यासन क्र. ५ मधील उपलब्ध अभिलेखाची छाननी केली असता, तेथील मोठ्या प्रमाणातील अभिलेख वाळवी लागून भुगा झाल्याचे निष्पन्न झाले असल्याची बाब अपिलार्थी यांचे निदर्शनास आणून दिली. तसेच तत्का तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी याबाबतचा अभिलेख वाळवी लागून नष्ट झाल्याबाबतची सत्यता स्वतः पडताळणी करण्याकरीता अपिलकर्ता यांना याबाबतची नस्ती व वाळवी लागलेल्या अभिलेखाचे फोटोच्या प्रती व्हिडीओ कॉलवरुन प्रत्यक्ष दाखविल्या. त्यामुळे त्यांना त्यांनी माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती देता येणे शक्य नसल्याचे कळवून सदर नस्तीवरील टिप्पणी व वाळवी लागलेल्या अभिलेखाच्या फोटोच्या प्रती अपिलामध्ये अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देवून त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्यात आला.

७. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे माहिती प्रथम अपील आदेशासह संलग्न करुन पाठविण्यात आली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना पाठविण्यात आलेली माहिती आयोगास सादर केली.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०५.२०२६**

5-5-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**